INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 8.031 (SJIF 2025)

# शिवकालिन किल्यांचे ऐतिहासिक महत्व
# (Historical Importance of Shivakalin Forts)

**प्रा.डॉ. के. के. कलाणे**

इतिहास विभाग प्रमुख,
प्रमिलादेवी पाटील महाविद्यालय,
नेकनुर, ता.जि. बीड (महाराष्ट्र, भारत)

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/11.2025-25991427/IRJHIS2511024

**प्रस्तावना :**

भारतीय युद्धशास्त्रात प्राचीन काळापासून किल्यांना महत्वाचे स्थान आहे. मात्र गडकिल्यांचे खऱ्या अर्थाने महत्व् ओळखले ते मध्ययुगातील छत्रपती शिवाजी महाराजांनी. छत्रपती शिवाजी महाराजांनी सहयाद्रीच्या अंगाखांद्यावरगडकोटांचा साज चढवला आणि सर्व-सामान्य मावळयांच्या साथीनं व गडकिल्यांच्या आश्रयाने स्वराज्याची मुहूर्तमेढरोवली. जगातल्या कुठल्याही प्रदेशात नसतील एवढे डोंगरी किल्ले महाराष्ट्रात आहेत. डोंगर कोरण्याची कला शिवकाळात गतिमान झाली होती. "शिवरायांचे दुर्गम्हणजे भारतातील त्यांच्या शत्रुंना धाक होता. त्यांच्या राष्ट्राची ती संवर्धनभूमी होती. त्यांच्या विजयाचा तो पाया होता, त्यांच्या वाढत्या महत्वाकांक्षेचा तो जिना होता. दुर्ग हेच त्यांचे निवासस्थान आणि तेच त्यांच्या आनंदाचे निधान होते.[1]" थोडक्यात दुर्गहेच शिवरायांचे सवर्स्व होते. एवढेच नव्हे तर दुर्गहे शिवकालिन स्वराज्याचा प्राण होता. 'संपूर्णराज्याचे सार ते दुर्ग या एकाच वाक्यात मध्ययुगीन काळातील किल्यांचे महत्व रामचंद्रपंत अमात्यांनी 'आज्ञापत्रां' मध्ये स्पष्ट केले आहे.

**उददेश :**

1. शिवकालिन दुर्गाचेमहत्व जाणूनघेणे.
2. राज्यनिर्मितीबरोबरच राज्य संरक्षण आणि राज्यविस्तार यासाठी गडकिल्यांना असणारे महत्व याचा आढावा घेणे.
3. शिवकालिन गडकिल्यांचे अंतर्गत व्यवस्थापन अभ्यासणे.

**गृहितके :**

1. शिवकाळामध्ये किल्यांना अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले होते.
2. शिवकालिन किल्ले हे महाराष्ट्राच ऐतिहासिक आणि सांस्कृतिकसंचितहोय.

**शिवकालिन किल्यांचे वर्गीकरण :**

शिवकालिन किल्यांचे घाटमाथ्यावरील किल्ले, देशावरील किल्ले, कोकणातील किल्ले, कर्नाटकातील किल्ले व सागरी किल्ले असे वर्गीकरण करता येईल. घाटमाध्यमावरील किल्लयांमध्ये शिवनेरी, सिंहगड, पुरंदर, राजगड, तोरणा, राजगड, प्रतापगड, विशाळगड, पन्हाळगड इ. महत्वाच्या किल्यांचा समावेश होतो. याच घाटमाथ्यावरील किल्यांना शिवकाळात अनन्य साधारण महत्व होते. याच भागातून शिवाजी महाराजांनी अदिलशाही, मोगल यांच्याशी यशस्वी सामना केला. तसेच राजधानीचे किल्लेही याच भागातील होते.

**दख्खन प्रदेशाची भौगोलिक वैशिष्टये :**

ज्या भागात मराठयांचे राज्य स्थापन झाले आणि अवघ्या पाव शतकात वृध्दिंगत झाले, तो भाग मध्ययुगामध्ये दख्खन (The Deccan) या नावाने ओळखला जात होता. या प्रदेशात स्थूलमानाने खानदेश, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, कोकण आणि विजापूर व बेळगांव या जिल्हयातील काही भागाचा समावेश होता. दख्खनच्या प्रदेशात उत्तरेकडून दक्षिणेकडे सहयाद्री पर्वत पसरलेला असल्यामुळे घाटमाथा, देश आणि कोकण असे तीन स्वाभाविक भाग तयार झाले आहेत.[2] शिवाजी महाराजांच्या राजकीय हालचाली ज्या मावळ भागातून झाल्या तो भाग घाटमाथ्याचाच पोटविभाग असून, पुणे जिल्हयाच्या पश्चिमेकडील पट्टयाचा त्यात समावेश होता. मावळ भागात लहान लहान नदयांची खोरी आणि तुटक परंतु गगनचुंबी उंची असलेल्या टेकडया यांचा समावेश होतो. देश भागात सातमाळा – अजिंठे, बालाघाट आणि महादेव या पर्वतरांगा असल्यामुळे या दरम्यानच्या सपाटीच्या प्रदेशांना नैसर्गिक संरक्षण लाभलेले आहे. कोकण प्रदेशास पूर्वेकडून सहयाद्रीच्या कोटाचे संरक्षण मिळाले असून पश्चिमेस अथांग अरबी समुद्रामुळे या भागास विस्तृत किनारा मिळाला आहे.[3] थोडक्यात घाटमाथ्यावरील किल्यांना शिवकाळात अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले होते. घाटावरील बहुतेक किल्ले शिवपूर्व काळापासूनच पहारा करण्याचे कार्य बजावत होते.

**शिवकालिन आरमार :**

कोकणपट्टीच्या पश्चिमेस अरबी समुद्र आहे. याच समुद्रमार्गे परकीय सत्तांनी भारतात येवून आपले व्यापारी संबंध प्रस्थापित केले. तसेच त्यांनी या पश्चिम किनाऱ्यावर वखारी स्थापन करून आपले वर्चस्व् निर्माण केले. परकीयांच्या आक्रमणाची भीती लक्षात घेऊन मध्ययुगीन राज्यकर्त्यांनी कोकणात किल्यांचे जाळे तयार केले. सोहाव्या – सतराव्या शतकात जलमार्गाचा शोध घेवून भारताबरोबर व्यापारी संबंध प्रस्थापित करण्याची लाट युरोपियन देशात उसळली. प्रथम पोर्तुगिजांनी पश्चिम किनाऱ्यावर गोव्याच्या प्रदेशात आपले वर्चस्व् प्रस्थापित केले. फ्रेचांनी पूर्वेकडील किनाऱ्यावर पाय ठेवला तर पाठोपाठ इंग्रजांनीपूर्व आणि पश्चिम किनाऱ्यावर वखारी उघडण्याचा उपक्रम हाती घेतला. सिद्दीनी जंजिऱ्याचा अभेद्दय किल्ला उभारून पश्चिम किनाऱ्यावर आपले वर्चस्व् प्रस्थापित केले.[4] थोडक्यात पश्चिम किनाऱ्यावर परकिय सत्तांनी आपले वर्चस्व् निर्माण करून आपल्या वखारी स्थापन केल्या होत्या.

स्वराज्य निर्मितीनंतर शिवरायांनी पाश्चात्यांचे सामर्थ्य पाण्यात आहे हे ओळखून पश्चिम किनारा सुरक्षित करण्यासाठी जलदुर्ग उभारले. आरमाराचे महत्व ओळखणारे मध्ययुगातील शिवाजी महाराज हे पहिलेच भारतीय राज्यकर्ते होते. परकिय सतांना शह देण्यासाठी त्यांनी सिंधुदुर्ग,पद्मदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग,खांदेरी – उंदेरी अशा सागरी किल्यांची उभारणी केली. शिवाजी महाराज केवळ जलदुर्गबांधून थांबले नाहीत तर पुढे पाश्चात्यांशी संघर्ष होणार हे ओळखून आपले आरमारी सामर्थ्य वाढवले. शिवाजी महाराजां- एवढे आरमारांचे महत्व् इतर कोणाही भारतीय राज्यकर्त्यांनी मध्यकाळात ओळखले नाही. अमात्यांनी आज्ञापत्रात म्हटले आहे, 'आरमार म्हणजे स्वतंत्र एक राज्यांगच आहे.... ज्याच्याजवळ आरमार त्याचा समुद्र' पाश्चात्यांच्या प्रवृत्तीचे विश्लेषण करताना अमात्य लिहितात... 'त्यास ही हट्टी

जात, हातास आले स्थूळ मेल्यानेही सोडावयाचे नव्हते.[5] पाश्चात्यांची ही वृत्ती लक्षात घेऊनच शिवाजी महाराजांनी आरमार आणि जलदुर्ग यांची उभारणी करून पश्चिम किनाऱ्यावरील परकीयांचा प्रभाव कमी करण्याचा प्रयत्न केला.

**शिवकालीन गडकिल्याचे अंतर्गत व्यवस्थापन :**

शिवाजी महाराजांनी किल्याची उपयोगिता लक्षात घेऊन मोठया प्रमाणात किल्याची बांधणी व दुरूस्ती करून किल्यांच्या तीन साखळया तयार केल्या ज्यामुळे स्वराज्यास बळकटी आली. फक्त गड-किल्ले हस्तगत करणे, नविन गडकिल्ले बांधणे एवढेच पुरेसे नसून त्याची अंतर्गत व्यवस्था मजबूत करणे यावरही शिवाजी महाराजांनी भर दिला. दुर्गाचेसामर्थ्य शिबंदीच्या निष्ठेवर, ध्यैर्यावर व सावधानतेवर अवलंबूनअसते हे शिवाजी महाराजांनी जाणले होते. त्यांनी किल्यावर प्रामाणिक, कार्यक्षम अधिकाऱ्यांची निवड केली. तसेच राज्याभिषेक शके 1 आनंदनाम संवत्सरे, जेष्ठ वद्य त्रयोदशीस कानुनजाबता (राज्यकारभाराविषयी सुसूत्रमाहिती देणारे नियम) जाहीर करून कलम क्र.12 मधील तरतुदीनुसार किल्यावरील कामाच्या वाटणीच्या घटनेला एक विशिष्ट दर्जा व कायद्याचे स्वरूप दिले. हा कानुनजाबता जरी राज्याभिषेकाच्या वेळी पूर्ण केला असला तरी यातील बहुतेक सर्व व्यवस्था सुरूवातीपासूनचत्यांनी अमलात आणली असावी हे लक्षात येते. [6] त्यामुळे शिवाजी महाराजांनी निर्माण किलेले गड-किल्यांचे अंतर्गत व्यवस्थापन अभ्यासणे महत्वाचे ठरते. ते पुढील मुद्दांच्याआधारे अभ्यासता येते.

राजनीतीज्ञ कोटिल्यांनी निरनिराळया प्रशासन विभागाच्या कार्याची माहिती देण्यापूर्वी खाते प्रमुखांच्या योग्यतेसंबंधी बरीच माहिती दिलेली आहे. कौटिल्य म्हणतो की, "माणूस प्रकृतीने घोडयासारखा असतो. (स्वाराची मांड पक्की नसल्यास घोडा नेईल तिकडे स्वारास जावे लागते तद्वत) अधिकारी अंगिकृत कार्यात विकृती निर्माण करू शकतो. म्हणूनच त्याची परीक्षा वारंवार घेतली पाहिजे. अधिकारी विकृती निर्माण करणार नाही यासाठी राजाने जागरूक राहिले पाहिजे. तसेच त्याच्या हातून भ्रष्टाचार होणार नाही, याविषयी राजा दक्ष असला पाहिजे. पाण्यातला मासा पाणी केव्हा पितो हे (पाण्याबाहेर असणाऱ्यांच्या) लक्षात येत नाही तव्दत हे अधिकारी कधी भ्रष्टाचारास प्रवृत होतील याची शाश्वती देता येत नाही."[7] या सर्व बाबींचा सखोल विचार करूनच शिवाजी महाराजांनी प्रामाणिक व कर्तबगार व्यक्तींची किल्यावरील अधिकारी म्हणून निवड केली. किल्याच्या आतील सुव्यवस्थेकरीता नेमणूक करताना पराक्रम, प्रामाणिकपणा, स्वामीनिष्ठा हे गुण विचारात घेतले जात.

**किल्लयांचे ऐतिहासिक महत्व :**

मध्ययुगात किल्ले हे संरक्षण, लष्करी मोहिम, प्रशासकीय केंद्र आणि आर्थिक संसाधनाचे केंद्र म्हणून अत्यंत महत्वाचे होते. मराठयांच्या इतिहासामध्ये शिवकाळात राज्यस्थापना, राज्यविस्तार आणि राज्यरक्षण किल्यामुळे झाले हे आपणास निर्विवादपणे मान्य करावे लागेल. ज्याच्या हाती किल्ले त्याच्याकडे किल्याच्या सभोवतालचा प्रदेश असे समिकरण त्या काळात निर्माण झाले होते. किल्ले हे शत्रूपासूनस्वराज्याचे व प्रजेचे संरक्षण करण्यासाठी नैसर्गिक तटबंदी म्हणून काम करत. व्यापारी मार्ग आणि महत्वाच्या प्रदेशावर नियंत्रण ठेवण्यासाठी किल्यांचा उपयोग होत असे. कर्नाटकातील किल्यामुळे शिवाजी महाराजांनी मोगलांच्या विशाल सैन्याला रोखले आणि मराठा राज्य जीवंत ठेवले. गटकोटाचे महत्व सभासदानी आज्ञापत्रात पुढीलप्रमाणे वर्णिले आहे. "संपूर्णराज्याचे सार ते दुर्ग, दुर्गनसता मोकला देश परचक्र येतांच प्रजा मग्न होऊन देश उद्धस होतो…. गडकोटविरहित जे राज्य, त्या राज्याची स्थित म्हणजे आभ्रपटलन्याय आहे. म्हणजे वारा येताच ढग उधळले जातात तशी अवस्था. याकरिता ज्यास राज्य पाहिजे त्याणी, गडकोट हेच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचे मूल, गडकोट म्हणजे खजिना, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गटकोट म्हणजे आपली वसतिस्थळे, गडकोट म्हणजे सुखनिद्रागार, किंबहुना गडकोट म्हणजे

आपले प्राणसंरक्षक.''[8] रामचंद्रपंताच्या आज्ञापत्रातील या उल्लेखावरून 17 व्या शतकात गडकोटास राजकियदृष्ट्या किती महत्व होते हे स्पष्ट होते. किल्याचे हे ऐतिहासिक महत्व ओळखून शिवाजी महाराजांनी स्वराज्यात किल्याची साखळीच तयार केली. जुण्या किल्याची भक्कम डागडूजी करतानाच अनेक नविन किल्ले उभारले. किल्यामुळे राज्याला बळकटी आली. शिवाजी महाराजांच्या ताब्यातील जवळपास 360 किल्ले हे स्वराज्याचा प्राण होते. एकएक किल्ला वर्षभर लढवला तरी औरंगजेबसारख्या शत्रूला स्वराज्य घ्यायला 360 वर्षे लागतील असा विश्वास शिवाजी महाराजांना होता. मराठयांच्या स्वातंत्र्य युध्दात हा विश्वास स्वराज्यातील किल्यांनी सार्थ ठरविला.

**सारांश :**

दुर्ग हा प्रकार शिवरायांनी महाराष्ट्राच्या जीवनामध्ये इतका मुरवून टाकला की, दुर्गाविगळया तत्कालीन महाराष्ट्राची कल्पनाही करता येणे शक्य नाही. म्हणूनच त्यांच्या नावामागे दुर्गाधिराज हे विशेषण शोभून दिसते. स्वराज्यातील जी जी स्थळे त्यांना दुर्गम व सुंदर वाटली त्या प्रत्येक स्थळी असलेले जुने दुर्ग त्यांनी अधिक उत्कृष्ट बांधले, नवे निर्माण केले व मातीच्या गडया पाडून त्याजागी नवीन दुर्ग बसविले.

शिवकालीन किल्यांचे ऐतिहासिक महत्व हे त्यांच्या अभेद्य संरक्षणात्मक क्षमतेमध्ये, स्वराज्याच्या राजकीय आणि लष्करी केंद्र म्हणून असलेल्या भूमिकेत, तसेच प्रशासकीय आणि आर्थिक गरजा पूर्ण करण्याच्या सामर्थ्यात आहे. हे किल्ले केवळ तटबंदी नसून ते मराठा साम्राज्याचे आधारस्तंभ होते. शिवाजी महाराजांचे किल्ले केवळ लष्करी तळ नव्हते, तर प्रशासकीय आणि राजकीय केंद्र होते. त्यांनी मराठयांना शत्रूपासून संरक्षण दिले, स्वराज्याला बळकटी आणली, आणि दक्षिणेकडील मराठा साम्राज्याच्या विस्ताराला मदत केली. या किल्यामुळे मराठयांचे राज्यं टिकून राहिले आणि ते आजही महाराष्ट्राच्या समृद्ध इतिहासाचे आणि पराक्रमाचे प्रतीक आहेत. 17 व्या शतकातील शिवरायांच्या पराक्रमाची दखल जागतिक पातळीवर गेली आहे. 11 जुलै 2025 रोजी युनेस्कोने शिवरायांचे 12 किल्ले जागतिक वारसा यादीत समाविष्ट करून त्यांचे महत्व जागतिक स्तरावर नेले आहे. राजगड, शिवनेरी, राजगड, पन्हाळा, लोहगड, प्रतापगड, साल्हेर, खांदेरी, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, आणि जिंजी या किल्यांचा युनोस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश झाला आहे. छत्रपतींच्या आणि महाराष्ट्राच्या इतिहासाचा गौरव वाढवणारी ही घटना होय. यावरून शिवरायांचे आणि त्यांच्या गडकिल्यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात येते.

**निष्कर्ष :**

1. मध्ययुगात त्यातही शिवकाळात गडकिल्यांना अनन्यसाधारण महत्व होते.
2. किलले उभारणीमागे जनहित व स्वराज्य संरक्षण हा उदात्त् व व्यापक दृष्टीकोण होता.
3. गडकोट हे शिवरायांच्या स्वराज्याचा प्राण होता.
4. स्वराज्यातील गडकोट व त्याचे व्यवस्थापन पाहता त्यामध्ये शिवाजी महाराजांची दुरगामी राजनीती दिसून येते.
5. आरमारांचे महत्व ओळखणारे शिवाजी महाराज हे पहिले भारतीय राज्यकर्ते होत.
6. शिवाजी महाराज हे दुर्गशास्त्राचे सखोल अभ्यासक होते.
7. अमात्यांनी गडकोटांचे वर्णिलेले महत्व शिवरायांनी प्रत्यक्षात उतरविले.

**संदर्भ सूची :**

1. सावंत बी.एस., जाधव व्ही.के., मराठयांचा प्रशासकीय आणि सामाजिक, आर्थिक इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती 1997, पृ. 136.

2. कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह., (संपा.) मराठयांचा इतिहास, खंड पहिला, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे -30, प्रथमावृत्ती 1984 पृ. 321.
3. उपरोक्त पृ. 321
4. उपरोक्त पृ. 325.
5. उपरोक्त पृ. 326
6. पठाण यु.म., (संपा.) श्री. शिवप्रभूंचे चरित्र (सभासद वखर) समर्थ प्रकाशन, औरंगाबाद, पृ. 23
7. खरे ग.ह. (संपा.) स्वराज्यातील तीन दुर्ग चित्रशाळा प्रकाशन, पुणे 1967 पृ. 22
8. ढेरे रा.चिं. (संपा.), आज्ञापत्र, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती 2011, पृ. 96-97.